ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 310-M (RS)**

**Code No. : 310-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ಪ್ರಥಮ ವರ್ಷ

# D.El.Ed. FIRST YEAR

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಕಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)

# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# FACILITATING LEARNING ( LPS )

# FIRST LANGUAGE – MARATHI

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 07. 01. 2020 ]

Date : 07. 01. 2020 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

***सामान्य सूचना :*** i) प्रत्येक उत्तराचे चिंतन करून, संघटन करून लिहीण्यास योग्य व्हावे म्हणुन या पेपरला 3 तास वेळ दिला आहे.

ii) प्रत्येक प्रश्नासाठी ज्या सूचना दिल्या आहेत, त्या सुचनांप्रमाणे उत्तरे लिहा.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य असे एक उत्तर निवडून लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण दिलेला आहे. प्रत्येक प्रश्न सक्तोचा आहे. ( प्रत्येक प्रश्नाला **1** गुण ) : $10 \times 1 = 10$

1. मातृभाषेचे प्रमुख लक्षण –

(अ) कुटूंबात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीत बदलत जाणे

(आ) शाळत देण्यात येणारे अध्ययन माध्यम

(इ) एका प्रदेशात सर्वांनी बोलण्याची भाषा

(ई) पाठ्यपुस्तकाची भाषा.

2. बालसाहित्य समोक्षा म्हणजे –
   (अ) प्रशिक्षणार्थीनी मुलांचे साहित्य वाचन करणे
   (आ) पालकांनी मुलांप्रमाणे साहित्याचा संग्रह करणे
   (इ) मुलांसाठी तयार केलेल्या संपुर्ण साहित्याची जाणीव करुन घेण्याचा प्रयत्न करणे
   (ई) बालसाहित्य प्रकाशन विक्री केंद्राला भेटी देणे.
3. ऐकणे व श्रवण करणे यामधील फरक –
   (अ) ऐकलेले श्रवण होत नाही
   (आ) ऐकणाऱ्या व्यक्तीने संपुर्ण सहभागी झाल्यास श्रवण होते
   (इ) श्रवणात असणारा विशिष्ट उद्देश ऐकण्यात येतो
   (ई) श्रवण हे केवळ ऐकण्यापुरते मर्यादित असते.
4. भाषीक कौशल्याची दुसरी पायरी हो होय –
   (अ) लेखन (आ) श्रवण
   (इ) भाषण (ई) वाचन.
5. सामान्य संभाषणात आवश्यक तितक्या भाषा मूल येथे शिकते –
   (अ) शाळेत (आ) घरी
   (इ) परिसरात (ई) वर्गात.
6. प्रकट वाचन म्हणजे हे होय –
   (अ) मौनवाचन (आ) मुकवाचन
   (इ) मुखवाचन (ई) मनात वाचणे.
7. वाचन कौशल्य आत्मसात करण्यासाठी खालील वाक्ये क्रमवार मांडा –
   (अ) शब्द रूपाने वाचन करणे (आ) चित्राच्या सहाय्याने वाचन करणे
   (इ) अक्षर रूपाने वाचन करणे (ई) वाक्य रूपाने वाचन करणे.
8. वाचन कौशल्य आत्मसात करण्यास याची ओळख करुन देणे आवश्यक आहे –
   (अ) वाक्यांची (आ) अक्षर, शब्दांची
   (इ) स्वरांची (ई) व्याकरणाची.
9. श्रावणमासी हर्ष मानसी –
   (अ) क्षणात येई सर सर शिखे (आ) वरती बघता इंद्रधनुचा
   (इ) हिरवळ दाटे चोहिकडे (ई) क्षणात फिरूनी ऊन पडे.
10. प्राथमिक शिक्षणाला येथून सुरवात होते –
   (अ) पहिली पासून (आ) पाचवी पासून
   (इ) बालवाडी पासून (ई) दुसरी पासून.

## भाग - II

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **दोन** गुण ) : 5 × 2 = 10

11. ‘युनस्को’ संस्थेच्या म्हणण्यानुसार साक्षरता म्हणजे काय ?

12. माता आणि मातृभूमी यांच्या पंक्तीतच मातृभाषेला महत्व आहे. तुमचे मत मांडा.

13. मुलांना कथा सांगण्याच्या कृती संबंधी खालील अंश क्रमवार मांडा :

    i) मुळांच्या अभिव्यक्तीला मुक्त संधी दिली पाहिजे.

    ii) मुलांनी सांगावयाची कथा इतरांनी ऐकण्याचे वातावरण निर्माण केले पाहिजे.

    iii) मुलांना कथा माहित झाली की नाही याची खात्री करुन घेणे.

    iv) मुलाने कथा सांगताना ती बहिरंगाने समाप्त करावी.

14. मौनवाचन आणि प्रकट वाचन यातील फरक सांगा.

15. प्रारंभीच्या शिक्षणात मुलांच्या घरच्या भाषेची भुमिका थोडक्यात स्पष्ट करा.

16. मौखिक अभिव्यक्तीचा आणि साक्षरतेचा जवळचा संबंध आहे. चर्चा करा.

17. समावेशक वर्ग कसा असावा ?

18. मुलांच्या शिक्षणाच्या हक्काच्या कायद्यात सरकारने कोणती तरतुद केली आहे ?

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नाला निवड दिलेली आहे. त्यातोल कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **5** गुण ) : 8 × 5 = 40

19. अ) विद्यार्थ्याचे श्रवण कौशल्य विकसित करण्यासाठी कोणत्या उपाय-योजना करणे आवश्यक आहे ?

**किंवा**

आ) विद्यार्थ्यांचे भाषण कौशल्य विकसित करण्यासाठी कोणत्या उपाय-योजना करणे आवश्यक आहे ?

20. अ) कथा सांगणे ही एक कला आहे. कशी ते सांगुन, कथा सांगण्याचे उपयोग सांगा.

**किंवा**

आ) मुलांच्याकडून कथा सांगुन घेण्यासाठी कोणती तयारी करावी लागते ? स्पष्ट करा.

21. अ) अक्षरलेखनाचा अभ्यास केल्यानंतर स्वतंत्रपणे लेखन करावयाच्या पायऱ्या स्पष्ट करा.

**किंवा**

आ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने वर्गात मुलांच्याकडून लेखनाचा सराव कसा करून घ्याल.

22. अ) सुलेखन म्हणजे काय ? त्याची चार वैशिष्ट्ये सांगा.

**किंवा**

आ) 'फळा हा शिक्षकाचा खरा मित्र आहे.' या विधानाची चर्चा करा.

23. अ) वाचन क्षमतेत आढळणारे दोष स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मुखवाचन करताना कोणकोणत्या बाबी लक्षात घ्याव्या लागतात ?

24. अ) प्रारंभीच्या साक्षरतेचे महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

आ) संपन्मूल्य असा वर्ग बनविण्यात शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

25. अ) प्रारंभी शाळेत आलेल्या मुलांसाठी संपन्मूल्य असा वर्ग कसा निर्माण कराल ?

**किंवा**

आ) सर्व समावेशक वर्गाची गुणलक्षणे सविस्तर सांगा.

26. अ) सर्व समावेशक वर्गात शिक्षकांने श्रवण दोष असलेल्या मुळांसाठी कोणते मार्गोपाय अवलंबवावेत ?

**किंवा**

आ) सर्वसमावेशक वर्गातील मुलांचे मूल्यमापन कसे करावे ? स्पष्ट करा.